CCE RF/PF/RR/PR/NSR/NSPR(A)/666/004

**A**

**ಮಾರ್ಚ್/ಏಪ್ರಿಲ್ 2024 ರ ಪರೀಕ್ಷೆ – 1**

**MARCH/APRIL 2024 EXAMINATION-1**

ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12 ]

Total No. of Printed Pages : 12 ]

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 45 ]

Total No. of Questions : 45 ]

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**

**Code No. : 08-M**

**CCE RF/PF/RR/PR/NSR/NSPR**
**FULL SYLLABUS**

Question Paper Serial No.

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ

# Subject : First Language — MARATHI

**(ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಶಾಲಾ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಖಾಸಗಿ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಎನ್.ಎಸ್.ಆರ್. / ಎನ್.ಎಸ್.ಪಿ.ಆರ್.)**

**(Regular Fresh / Private Fresh / Regular Repeater / Private Repeater / NSR / NSPR)**

ದಿನಾಂಕ : 25. 03. 2024 ] [ Date : 25. 03. 2024

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-15 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-30 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-15 A.M. to 1-30 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**Cut here /ಇಲ್ಲಿ ಕತ್ತರಿಸಿ**

**विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये एकूण 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्नपत्रिका ही विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती प्रश्नपत्रिका उघडावयाची आहे. **(बाणाने दर्शविलेल्या ठिकाणातून प्रश्नपत्रिका कापून उघडा.)** डाव्या बाजूने कापून प्रश्नपत्रिका उघडू नका. प्रश्नपत्रिकेमधील सर्व प्रश्न असलेली पाने व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पहा.
3. प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या ही त्या प्रश्नाचे पूर्ण गुण दर्शविते.
5. प्रश्नांची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्नपत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.
6. तुम्हाला देण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेची आवृत्ती (version) आणि तुमच्या प्रवेशपत्रावर छापलेल्या प्रश्नपत्रिकेची आवृत्ती (version) दोन्ही एकच आहेत. याची खात्री करुन घ्या.

येथून कापा.

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्नपत्रिका येथून कापून उघडा.**

**25. 03. 2024**

**Tear here**

**I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा :** **6 × 1 = 6**

1. 'माझे डोके किल्ल्यात पाडावे' अधोरेखित शब्दाची विभक्ती ही आहे –

(अ) पंचमी (ब) सप्तमी

(क) संबोधन (ड) प्रथमा

2. 'वाग् + पति' या संधीचे उदाहरण आहे.

(अ) स्वरसंधी (ब) व्यंजनसंधी

(क) विसर्गसंधी (ड) पररूप संधी

3. 'हरणाने कान टवकारले' हे खालील पैकी या प्रयोगाचे उदाहरण आहे.

(अ) कर्तरी प्रयोग (ब) कर्मणी प्रयोग

(क) भावे प्रयोग (ड) सकर्मक प्रयोग

4. 'मी अभ्यास करतो' या वाक्यातील काळ ओळखा.

(अ) वर्तमान काळ (ब) भूतकाळ

(क) भविष्य काळ (ड) पूर्ण भूतकाळ

5. आयत्या बिळात ............... म्हण पूर्ण करा.

(अ) धोंडीबा (ब) कोंडीबा

(क) दाजीबा (ड) नागोबा

6. 'ऋणमुक्त' हे या समासाचे उदाहरण आहे.

(अ) तृतीया तत्पुरुष (ब) षष्ठी तत्पुरुष

(क) पंचमी तत्पुरुष (ड) द्वितीया तत्पुरुष

**II. पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा :**

**4 × 1 = 4**

7. भाषण करणारा : वक्ता :: भाषण ऐकणारा : ..................

8. झाडावर : शब्दयोगी अव्यय :: शाबास ! : ..................

9. सफल : असफल :: खुरटणे : ..................

10. घर : निवास :: राक्षस : ..................

**III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** **7 × 1 = 7**

11. बुधवारी काकूबाई कोठे गेल्या होत्या ?

12. लेखक कोणत्या गोष्टीच्या विरुद्ध आहेत ?

13. 'मनाचे पिंजरे' या पाठाचे मूल्य काय आहे ?

14. मूळ रुक्मिणी स्वयंवरातील ओव्यांची संख्या किती होती ?'

15. शाहीर कोणाला म्हणतात ?

16. हरि कोणावर फिदा आहे ?

17. 'पाठ आणि पोट यांचा झाला टाळ' ही कविता कोणत्या काव्यसंग्रहातून घेतलेली आहे ?

**IV. खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा :** **3 × 2 = 6**

18. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

(अ) आरती गाणे.

(ब) पाण उतारा करणे.

19. अलंकार ओळखून लक्षणे सांगा.

    ''आक्का आणि अण्णांचा संसार जणू सापमुंगसाचं वैर.''

20. गण पाडून वृत्त ओळखा.

    विद्याधिकार कुलशील सुरूपताही.

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :** **7 × 2 = 14**

21. 'मनुष्य एक झाड' असे लेखकास का वाटते ?

22. ''जात्यंघ हस्तीते पाहो गेले'' संदर्भासह अर्थ स्पष्ट करा.

23. चिं. वि. जोशींचा परिचय लिहा.

24. संत ज्ञानेश्वरांचा परिचय लिहा.

25. मुलांनी आईबापाबद्दल कोणता निर्णय घेतला होता ?

26. श्रीकृष्णाला काय आवडणार नाही असे रुक्मिणी म्हणते ?

27. ''कुठून आणतात तेल हळदीच्या वाटीचे बळ'' संदर्भासह अर्थ स्पष्ट करा.

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :** **1 × 3 = 3**

28. (अ) बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले.

(ब) सत्यमेव जयते.

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच–सहा वाक्यात लिहा :** **10 × 3 = 30**

29. फिरंग्याने श्रीमंतांकडे कोणता तह केला ?

30. विद्येसाठी डॉ० आंबेडकरांनी कोणकोणते कष्ट घेतले ?

31. जपानी तरुण मुलींची चेष्टा केव्हा होते ? जपानमध्ये कोणते निरुद्योगी प्रकार आढळत नाहीत ?

32. सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांनी कोणत्या प्रतिक्रिया दर्शविल्या ?

33. धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयाचे वातावरण कसे होते ?

34. माणसाला येणारी दुखणी आणि पाहुणे यातील साम्य कवीनी कसे सांगितले आहे ?

35. देशातील सकलास मानवता व राष्ट्रभावना कळल्याने काय होईल ?

36. पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोण कोण व कशाप्रकारे याचना करीत आहेत ?

37. काठी हातात आल्यावर गुराख्याने काय केले ?

38. धरण कवितेतील स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ–दहा वाक्यात लिहा :** **4 × 4 = 16**

39. आपला मुलगा पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करु शकत नव्हती ?

40. डॉक्टरांनी घेतलेल्या शिबिराचा अदृश्य परिणाम कोणता होता ?

**किंवा**

शिबिरं कोणासाठी घ्यावीत असे डॉक्टराना वाटले ? पर्यावरण या विषयांच महत्व डॉक्टर कसे पटवून देत ?

41. 'गाऊ त्यांना आरती' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

**किंवा**

कवी कोणाकोणाचे गुणगान करु इच्छितो ? का ?

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

पहिल्या हिरव्या ...........................

...............................................

...............................................

............................. धरणीच्या पोटी.

**किंवा**

कवच भूमिचे ................................

.................................................

.................................................

.................................. मात मृत्युवर.

**IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :**

**1 × 4 = 4**

43. आज भारत देशातील श्रेष्ठ व्यक्तिचे कडून आयुष्याचा अर्थ नि व्यवहार नियम जाणून घ्यावेत, राष्ट्रीय एकात्मता धर्म, वर्ण, पंथ, जात, काहीही असो. व्यक्तिचे जीवन यशस्वी करणारी संघर्षरहित अशी आदर्श समाज व्यवस्था आवश्यक असते. जगातील महासत्ता आणि देश शांतीच्या शोधात आहेत. अनादी काळापासून भारतभूमी ही शांतिभूमी आहे. इतर राष्ट्राना शांतीचा संदेश देण्यासाठी आणि जीवनाचे उच्च ध्येय समजावून सांगण्यासाठी आपण आजपावेतो शांतिदूत पाठविले आहेत. संघर्ष विरहीत समाज व्यवस्था ही भारताने जगाला दिलेली सर्वात अप्रतिम आणि अमूल्य अशी देणगी आहे.

**प्रश्न :**

(अ) व्यक्तिचे जीवन यशस्वी होण्यासाठी आज कशाची गरज आहे ? 2

(ब) भारताने जगाला दिलेली सर्वोत्तम देणगी कोणती ? 2

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** **1 × 5 = 5**

44. शालेय सहली संबंधी चौकशी करणारे पत्र सहलप्रमुख या नात्याने आगार प्रमुखास ( बस डेपो मॅनेजर ) लिहा.

**किंवा**

जिल्हा स्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम आलेल्या मित्रास / मैत्रीणीस अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंध लेखन करा :**

**1 × 5 = 5**

45. (अ) आई – एक महान दैवत.

(ब) संगणक – एक स्नेही.

DO NOT WRITE ANYTHING HERE